REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER – 2017

# सिद्धांच्या परंपरा, प्रेरणा व स्वरूप



**प्रा.डॉ. इ.जा. तांबोळी**
**प्रमुख मराठी विभाग, सोशल कॉलेज, सोलापूर.**

## प्रस्तावना :

महाराष्ट्र आणि कर्नाटक ही दोनही राज्ये वेगळी वाटत असली तरी ती बऱ्याच बाबतीत एकरूप वाटतात. भाषा भिन्न असली तरी महाराष्ट्रातील विविध भक्तिसंप्रदाय आपल्याला कर्नाटकातही दिसून येतात. पंढरपूरला असलेले विठ्ठल मंदिर व त्याभोवताली उभा असलेला वारकरी संप्रदायाचा विचार केला असता विविध राज्यातून आपल्याला भक्तांचा लोंढा वारीला पंढरपुरात आलेला दिसून येतो. महाराष्ट्रातील लोक उत्तरेकडून आलेल्या आर्यकुळातील असले आणि कर्नाटकातील लोक द्रविड कुळातील असले तरी दक्षिण महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटकाचा उत्तर भाग हा एकेकाळी एकच होता. या प्रदेशावर मध्ययुगात राष्ट्रकूट, चालुक्य या राजवटींची सत्ता होती. मध्ययुगात आर्य व द्रविड संस्कृतीचा संगम झालेला होता. या संदर्भात डॉ. तुळपुळे यांनी असे म्हटले आहे की, ''पंढरपूर आज महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या सीमारेषेजवळ असले तरी प्राचीनकाळी ते कर्नाटकात मोडत असावे.'' असा विचार तुळपुळे यांनी मांडलेला आहे. एकंदरीत महाराष्ट्रात विविध भक्तीसंप्रदायाची परंपरा दिसून येते. आपण विविध संप्रदायाची माहिती खालीलप्रमाणे पाहू. तसेच सिद्धांच्या विषयी तपशीलवार विवेचनाची मांडणी केलेली आहे.

### १) वारकरी संप्रदाय

महाराष्ट्रात १२ व्या शतकात ज्ञानेश्वरांच्या प्रेरणेने वारकरी संप्रदायाची उभारणी झाली. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी भक्तिमार्गाचा पुरस्कार करणाऱ्या भागवत धर्माचा पुरस्कार केला. भागवत धर्म विशाल आणि सर्वसमावेशक अशा वैदिक धर्माचेच एक विकसित रूप आहे. महाराष्ट्रात रूजलेला आणि वाढलेला वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचा कौतुकच आहे. अठरापगड जातीच्या भक्तांना पंढरीच्या विचारपीठावर एकत्र आणून अभंगाद्वारे आपली विचारसरणी मांडण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. भक्तिची शिकवण देणारा समानतेचा ध्वज फडकविणारा वारकरी संप्रदाय आहे. या संदर्भात वारकरी संप्रदायाचे अभ्यासक भा. पं. बहिरट यांनी केलेले विवेचन महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, ''वारी करणारा तो वारकरी असे सामान्यता म्हटल जाते. आषाढी, कार्तिकी, माघी, अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरात जातो, तो पंढरीचा वारकरी म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो वारकरी पंथ होय.''[१] अशाप्रकारे अनेक उल्लेख वारीचे अभंगातून येतात. याठिकाणी इरावती कर्वे यांच्या मताचा आपण विचार करू या. इरावती कर्वे म्हणतात की, महाराष्ट्र हा मूलतः शिवभक्त आहे. महाराष्ट्रात प्रत्येक गावात शिवाचे मंदिर आहे. खंडोबा, मल्हारी ही शिवाचीच रूपे आहेत. महाराष्ट्रातील बहुतेक शिवमंदिरे डोंगरावर आहेत.''[२] अशाचप्रकारे मत इरावती कर्वे यांनी व्यक्त केल आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा अभ्यास करताना असे जाणवते की, महाराष्ट्रातील जनमाणसात विठ्ठल उपासनेचे आणि

ग्रामव्यवस्थेत शिवमंदिराचे अस्तित्व जाणवते. वारी कोणी व केव्हा सुरू केली. याची निश्चित माहिती उपलब्ध नाही. ही प्रथा ज्ञानेश्वरपूर्वकाळात होती. ज्ञानेश्वरांचे वडील पंढरीची वारी करीत असल्याचा उल्लेख नामदेव गाथेत आहे.

### वारकऱ्यांची धर्मस्थळे

**अ) पंढरपूर :–** पंढरपूर येथे विठ्ठलाचे मंदिर आहे. आषाढी आणि कार्तिकेला विठ्ठलाची महापूजा होते. वारकरी या दोनही वाऱ्यांना आपली हजेरी लावतात. पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे आद्यक्षेत्र मानबिंदू आहे.
**ब) आळंदी :–** पंढरीइतकेच आळंदीला महत्त्व आहे. पंढरीची वारी ही देवाची तर आळंदीची वारी ही संतांची वारी असे मानले जाते.
**क) देहू :–** संत तुकारामांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या देहूला वारकरी भेट दिल्या खेरीज वारकऱ्यांची आळंदी वारी पूर्ण होत नाही. वारकरी संप्रदायातील प्रमुख संतांची स्थाने वा समाधीस्थाने पवित्र मानली जातात.

### २) वीरशैव संप्रदाय:–

शिवाची उपासना अनेक काळापासून चालत आलेली आहे. शिवोपसकांचे अनेक संप्रदाय आणि पंथ, महत्त्वाचा शिवोपासक संप्रदाय मोठ्या प्रमाणात दक्षिण भारतात कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र, तामिळनाडू आणि केरळ आदी राज्यात पसरलेला दिसतो. शिवाची उपासना इष्टलिंगाद्वारे होते. शिवाची प्रतिमा अथवा स्थावरलिंगपूजा तात्विकदृष्ट्या मान्य नाही. वीरशैव हा एक धर्म आहे. लिंगायत धर्म असेही म्हणतात. वीरशैव हा एक़ प्रमुख भारतीय धर्म आहे. या धर्माच्या बाबतीत प्रा. जी. एम. रेचन्ना यांचे मत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात की, ''भारतातील प्रमुख धर्मापैकी एक़ म्हणून वीरशैवांचा उल्लेख न करता लिहिला गेलेला कोणताही ग्रंथ परिपूर्ण व सर्वसमावेशक ठरणार नाही. वीरशैव धर्माला जैन, बौद्ध इत्यादी धर्माप्रमाणेच ऐतिहासिक प्रगती, प्रभाव तसेच अवनती व पुनरूज्जीवन लाभलेले आहे.''[६] वीरशैव धर्माची खास लक्षणे विशद करताना असे जाणवते की, वीरशैव धर्म हा विशाल आहे. हा धर्म मानवतावादी आहे. सर्वसमन्वयवादी आहे. पुरातन धर्म आहे. या धर्मात ऐहिक व पारलौकिक बाबींना स्थान आहे. वीरशैव धर्मामध्ये तत्त्वज्ञानाचा सुरेख संगम आढळतो. वीरशैव धर्माच्या वैशिष्ट्यपूर्णतेबद्दल ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक रत्नाप्पा कुंभार म्हणतात की, ''वीरशैव धर्म हा राष्ट्रीय धर्म आहे. यामध्ये उच्चनीयता नाही, जातीभेद नाही. स्त्रियांना सर्व क्षेत्रात समान हक्क देणारा श्रमाला प्रतिष्ठा देणारा सर्वाशी समभाव मानणारा सर्वसमावेशक असा वीरशैव धर्म आहे

### ३) समर्थ संप्रदाय:–

यालाच रामदासी संप्रदाय अथवा स्वरूप संप्रदाय असे म्हणतात. शहाजीरानोच्या जहागिरीतील मसूर या गवातून आपल्या संप्रदायाचा प्रारंभ केला. तेथे राममंदिराची स्थापना करून आपल्या संप्रदायाचे मुख्य केंद्र स्थापन केले.९ अशाप्रकारे सज्जनगडावरही राममंदिर उभे केले. समर्थांनी अकरा मारूतींची स्थापना करून बलोपासना वाढविली.

### ४) नाथ संप्रदाय :–

नाथ संप्रदाय हा भारतीय संस्कृतीचा प्रमुख निर्गुण पंथ आहे. या पंथाभोवताली गूढतेचे वलय आहे. या पंथामधील कडकडीत वैराग्य, नैष्ठिक ब्रह्मचर्य या पंथात होते. या पंथाची आचारधारा अत्यंत कडक आहे. इ. स. ९ व्या व १० व्या शतकात हा पंथ उदयास आला. गोरक्षनाथ या पंथाचे प्रवर्तक होते. या पंथाचे शिव हे उपास्यदैवत आहे. हा पंथ गुरूप्रधान आहे. भारताच्या राजकीय व सामाजिक जीवनात इ.स.१० वे ११ वे शतक महत्त्वाचे मानले जाते. या कालखंडात विविध परकीय आपल्या देशात आले.

### ५) महानुभाव पंथ व साहित्य

''महानुभाव पंथापूर्वी म्हणजे बाराव्या शतकात महाराष्ट्रात अनेक पंथाचा उदय झालेला होता. यात वैदिक, बौद्ध, जैन, नाथ, शंकर, कंथडी पंथ, जंगम जोगी, विष्णुस्वामी, वैष्णव, शाक्त, गाणपत्य, कलंकमार्गी, विठ्ठल या पंथातील लोकांनी आपल्या विचारांचा व पंथाचा प्रचार व प्रसार सुरू केला होता. यानंतर म्हणजे तेराव्या शतकाच्या शेवटी प्रवर्तित झालेला पंथ म्हणजे 'महानुभाव पंथ' होय. हा पंथ महानुभाव पंथ, महात्मा पंथ, अच्युत पंथ, भटमार्ग आणि परमार्थ या सहा नावांनी ओळखला जात असे. आज महानुभाव पंथ हेच त्याचे प्रचारातले नाव असून मानभाव हा त्याचाच अपभ्रंश.''[१६]

### चक्रधर चरित्र :

चक्रधर स्वामींच्या बाबतीत जन्माबाबत एक दंतकथा सांगितली जात. भडोचच्या विशालदेव नावाच्या प्रधानाचा हरपाळदेव म्हणून एक मुलगा होता. वयाच्या सव्विसाव्या वर्षी तो मृत पावला. चांगदेव राऊळ यांनी त्यांच्या मृत शरीरात प्रवेश केला. गृहकलहामुळे हरपाळदेव रामटेक येथे आला. तेथे त्यांची ऋदिपूरचे श्री गोविंदप्रभू या सिद्ध पुरूषाची भेट झाली. त्यांनी त्याला दीक्षा देऊन त्यांचे नाव चक्रधर ठेवले. या काळात हंसाबा या स्त्रीशी विवाह झाला. गोविंदप्रभू यांच्याकडून दीक्षा घेतल्यानंतर त्यांनी स्वतंत्र पंथाची स्थापना केली. त्यांना भ्रमंतीच्या काळात अनेक शिष्य मिळाले. त्यांनी शिष्यगण वाढवून पंथातील आचारधर्माचा प्रसार केला.

### महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान

जीव, जगत आणि परमेश्वर यांचे अन्योन्यसंबंधविषयक विचार म्हणजे तत्त्वज्ञान. प्रपंच हा जड आणि देवता परेश्वर व जीव ही चेतन. जीव, देवता, प्रपंच परमेश्वर असे चार स्वतंत्र पदार्थ ते मानतात. या वस्तू अनादी, अनंत आहेत. त्या पूर्व स्वतंत्र असून त्यांचे पूर्ण ऐक्य कधीच होत नाही. जिवाला ईश्वराचे सानिध्य मिळाले, अविद्या नष्ट झाली तरी त्यांच्यातील द्वैत संपत नाही, असे हे तत्त्वज्ञान आहे. हे पूर्णद्वैती तत्त्वज्ञान आहे.

जीव हा 'बंधमुक्त' असतो असे ते म्हणतात, बंधमुक्त याचा अर्थ बद्ध असून मुक्तीची पात्रता असणारा. जीव अनंत आहेत. देवतासुद्धा अनंत असून त्यांचे नऊ समूह आहेत. देवता ८१ कोटी सव्वा लक्ष दहा आहेत. माया ही सर्वात उच्च देवता असून तिच्यामुळेच देह बनतो. पंचमहाभूते व त्रिगुण यांच्या विस्तारामुळे प्रपंच बनतो. प्रपंच दोन प्रकारचे. कारणरूप प्रपंच हा अनादी, सिद्ध, अव्यक्त असून त्याचा नाश होत नाही. कार्यरूप प्रपंच हा व्यक्त असतो. तो अनित्य असून संहारकाली नाश पावतो.

महानुभावांची परमेश्वरविषयक कल्पनाही भिन्न आहे. ''ब्रह्म+माया+ईश्वर=परमेश्वर. ब्रह्म हे सत्, माया ही चित् आणि ईश्वर हा आनंद म्हणून परमेश्वर हा सच्चिदानंद. जीव हे अनादिकाळापासून अविद्यामुक्त म्हणून बद्ध आहेत. ते मुळात अव्यक्त स्वरूपात असतात. त्यांच्या उद्धार करण्याची ईश्वराला इच्छा होतात. माया सृष्टिरचनेला प्रवृत्त होते आणि जीव व्यक्त दशेला येतात.''[१७]

शंकराचार्यांचा जगन्मिथ्यावाद वा विवंतवाद त्यांना मान्य नाही. माया भावरूप व सत्य आहे असे चक्रधर मानतात. जीव, प्रपंच, देवता व परमेश्वर यांचे खरे कार्य सांगणे हे अवताराचे कार्य मानले जाते.

### साधकांचा आचारधर्मः–

जे जे म्हणून विकार उत्पन्न करते ते ते साधकाचे कार्य मानावे असे या पंथाचा आचारधर्म सांगतो. भगवद्गीता आणि भागवत हे दोन ग्रंथ यांना प्रिय असले तरी श्रीचक्रधरांचा 'सूत्रपाठ' हा त्यांचा धर्मग्रंथ आहे व त्याचे पारायण केले जाते. 'अहिंसा, निःसंग, निवृत्ती आणि भक्तियोग ही चतुःसूत्री या पंथास मान्य असून चक्रधरांचे नाम, रूप, लीला, चेष्टा, स्थाने, श्रुती, स्मृती व प्रसाद ही सर्व महानुभावांस अतिप्रिय आहेत. त्यांची चक्रधरांसंबंधीची गुरूभक्ती तर काही अपूर्वच आहे. त्यांची आंगी, टोपरे, पडदणी, पावसडी, ताट, पाट, कवाड, उंबरवट, किंबहुना श्रीस्पर्श झालेली प्रत्येक वस्तू 'तयत माझे दंडवत' अशा पूज्य दृष्टीने ते पाहतात.''

### महानुभाव पंथाच्या अवनतीची कारणेः

चक्रधर हे महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक होते. त्यांनी अल्पकाळात पंथाचा चांगला प्रसार केला. नागदेवाचार्य, म्हाईंभट यांसारखे एकनिष्ठ शिष्य आणि महदाइसा, उमाइसा यांसारख्या त्यांच्या शिष्या होत्या. आठ वर्षात जवळजवळ आठशे शिष्य आणि तेरा शिष्या चक्रधरांच्या परिवारात होत्या. शिष्यत्व स्वीकारल्यानंतर वीस–पंचवीस नियम पाळण्याची शपथ शिष्याला घ्यावी लागे. तसेच क्रयविक्रय करू नये. आवडीनिवडी नसाव्यात, नवी वस्त्रे नेसू नयेत, झाडाखाली वसती करावी, तिसऱ्या प्रहरी भिक्षा मागावी असे अनेक विधिनिषेध सांगून ठेवले होते. चक्रधरानंतर शिस्त कमी झाली. त्यांच्यानंतर नागदेवाचार्य, बाईदेव, कवीश्वराबास, परशरामबास इ. आचार्य बनले.

### महानुभाव पंथाचे साहित्यः

मराठी साहित्याची गंगा सुरूवातीलाच पवित्र, भव्य आणि सुंदर बनविण्याचे श्रेय जर कोणाला द्यावयाचे असेल तर ते महानुभाव पंथालाच दिले पाहिजे. श्री चक्रधरांनी पंथ प्रसाराकरिता प्रथम महाराष्ट्र प्रांत निवडला. त्याचप्रमाणे मराठी भाषेलादेखील प्राधान्य दिले. 'सामान्य परिवारू' नागवू नये. म्हणून सुरूवातीला तरी मराठीत व देवनागरी लिपीत ग्रंथरचना झाली, तरी चक्रधरांच्या मागून साठ–सत्तर वर्षांनी पंथेतरांना आपली धर्मपुस्तके अगम्य व्हावीत या हेतूने ती सांकेतिक लिपीत लिहावयाला सुरूवात झाली. प्रथम राघव ऊर्फ रवळव्यास याने सकळ लिपी नावाची एक सांकेतिक लिपी श. १२७५ च्या सुमारास तयार केली. नंतर सुंदर (श. १२८५) पारमांडल्य (श. १२९०) अंक, शून्य, सुभद्रा श्री इत्यादी सांकेतिक लिप्या तयार होऊन त्यात महानुभावीय ग्रंथ लिहिले जाऊ लागल.

### ६) सुफी संप्रदायः–

न्यायदानाच्या अंतिम दिवशी जे लोक पहिल्या रांगेत उभे असतील. अल्लाहजवळ असतील त्यांना सुफी म्हटले पाहिजे. अल्लाहजवळ असणे म्हणजे अल्लाहच्या कृपेस पात्र असणे शेख बशीर बिन हारिसुलाफी म्हणतात की, सुफी हा शब्द ''साफ'' (शुद्ध) पासून निर्माण झाला. ज्यांचे अंतःकरण शुद्ध ते सुफी.

### इस्लामपूर्व सुफीः

इस्लामचा इतिहास पाहिला तर परिस्थिती अगदी वेगळी दिसते. ज्यांच्या घराण्यात मुहंमद पैंगबराचा (स्व) जन्म झाला, त्या इब्राहिमांच्या वडिलांचा व्यवसाय मूर्ती बनविण्याचा होता. इब्राहिम यांनी आपल्या वडिलांच्या व्यवसायाला आणि मूर्तीपूजेला विरोध केला. मक्केमधील काबाला मंदिराचे स्वरूप प्राप्त झाले होते. तेथे तीनशेसाठ मूर्तीची स्थापना करण्यात आली. रोज एका मूर्तीची पूजा केली जात असे. इब्राहिम यानी एकेश्वरवादाचा संदेश देऊन तत्कालीन धर्मसत्तेशी आणि राजसत्तेशी संघर्ष केला. इब्राहिम याना प्रेषितत्व मिळाले. त्यांच्याच घराण्यात जगद्‌गुरू हजरत मुहंमद पैगंबरांचा (स्व) जन्म झाला. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला. अरबानी त्यांचा छळ केला. प्राणघातक हल्ले केले. अनन्वितपणे त्यांच्यावर सामुदायिक प्राणघातक हल्ले करण्यात आले. स्वतः मुहंमद पैगंबर (स्व) मक्का सोडून मदिनेस आले.

### इस्लामच्या उदयानंतरचा सुफीवाद

एकेश्वरवादाचा पुरस्कार करताना अल्लाहविषयीची भीती, त्याची भव्यता, पोषणक्षमता, कनवाळूपणा इत्यादी गुणवैशिष्ट्यांची जाणीव साधकाला होते. अल्लाहविषयीचे प्रेम, त्याला भेटण्याची, पाहण्याची ओढ, विरहातील व्याकूळता सुफीत होते. चार खलिफांची कारकीर्द संपुष्टात आली. अबुबक्र, उमर, उस्मान आणि अली, यांच्यानंतर मुआविया खलिफा झाले. त्यानंतर लोकमताने खलिफा निवडण्याची पद्धत बंद झाली. वारसाहक्क सांगून येजीद सत्तेवर आला. इस्लामच्या कोणत्याच तत्वाचे पालन त्याने केले नाही. तो ऐष आरामात मग्न असे. अलींचे सुपुत्र इमाम हुसेन चारित्र्यसंपन्न होते. येजीदबरोबर त्यांचे करबला (इराक) येथे युद्ध झाले. या युद्धात ते शहीद झाले.

### सुफी विचारधाराः–

सुफी संप्रदायामध्ये गुरूला महत्त्वाचे स्थान आहे. गुरू शिष्याचा हात आपल्या हातात धरून त्याला कफनी प्रदान करतो. दीक्षा घेताना साधक मुंडन करतो. गुरूला मार्गदर्शक मानावे. साधकाची साधना अल्लाहच्या भेटीसाठी किंबहुना एकरूपतेसाठी असते. परमेश्वराच्या भेटीसाठी तीन अडथळे आहेत. इबादत, इताअत, अकबा असे तीन पडदे आहेत. इबादत म्हणजे आराधना (प्रार्थना), इताअत म्हणजे अनुकरण, अकबा म्हणजे चिरंतन जीवन. अल्लाहच्या मिलनासाठी तीन पडदे आवश्यक आहेत.

### ७) आनंद संप्रदायः–

महाराष्ट्र आणि कर्नाटकात आनंद संप्रदाय आजही अस्तित्वात आहे. आनंद संप्रदाय हा भक्तीमार्गी आहे. या संप्रदायाची सुरूवात कलियुगापासून दिसून येते. काशीचे विश्वेश्वर आदिनाथ या पंथाचे अभिमानी असून त्यांच्या प्रेरणेने हा संप्रदाय रूढ झाला. पवित्र गंगा नदीच्या प्रवाहात जन्मलेला बालक सदा हसतमुख असल्याने त्यास सदानंद असे नाव प्राप्त झाले. विश्वेश्वर यांना अनुग्रह करण्याची प्रार्थना केली. विश्वेश्वर असे म्हणाले की, 'कलियुगात देवताकडून कोणालाही प्रत्यक्ष अनुग्रह नाही. ते कार्य दत्तावर सोपविलेले आहे.

### ८) नागेश संप्रदाय

नागेश संप्रदाय हा एक स्वतंत्र व वेगळी छाप टाकणारा संप्रदाय आहे. कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमा प्रदेशात विस्तारीत झालेला आहे. वडवाळ सिद्धनागेश यांचा जिवित काळ १२९० ते १३४० असा देतात. ज्यांचे उपास्य दैवत नागनाथ उर्फ नागेश हेच आहे. या संप्रदायाचे एक वेगळे आचारधर्म व तत्त्वज्ञान आहे. हेग्रस हे नागेश संप्रदायाचे उपास्य दैवत. हेग्रस हे नागनाथांचे शिष्य होते. त्यांचे नातू अज्ञानसिद्ध. अज्ञानसिद्धांनी नागेश संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केलेली आहे. अज्ञानसिद्धांनी अद्वैतमताचे प्रतिपादन केले आहे. अद्वैतमताच्या अनुषंगाने पंचीकरणाचा विचार केला आहे.

### ९) सिद्धारूढ संप्रदाय

सद्‌गुरू सिद्धारूढ महास्वामी एक अवतारी पुरूष होऊन गेले. ते शिवअवतारी म्हणून विश्वविख्यात आहेत. कर्नाटक व महाराष्ट्रात या संप्रदायाचे अनुयायी आहेत. कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील एक छोटे चाळकापूर गाव आहे. या गावात या सिद्धारूढ स्वामींचा जन्म झाला. वयाच्या सातव्या वर्षी घराचा त्याग करून गुरू गजदंड महास्वामींच्या सेवेत रूजू झाले. चाळीस वर्षे भ्रमंती केली. हुबळी हे कार्यक्षेत्र निवडले. याठिकाणी राहून सामाजिक कार्य केले. त्यांचे अनेक शिष्य तयार झाले.

### सिद्धसंप्रदाय

सिद्ध संप्रदायाचा विचार करताना असे म्हणावेसे वाटते की, सिद्ध म्हणजे कोण? सिद्ध कोणास म्हणावे?, सिद्धांची लक्षणे कोणती? सिद्ध म्हणजे नेमके कोण आहेत? त्यांची वस्ती कोणती? त्यांचे ध्येय काय होते? अशा विविध प्रश्नांचा शोध आपल्याला घ्यावयाचा आहे. मानवी मन आशेने भरलेले आहे. अशा प्राप्य पदार्थांच्या संबंधात स्थूल झालेली असते. अप्राप्त गोष्टी सूक्ष्म असतात. दृढ अशा वैराग्याने आशा नाहिशी होते नि बुद्धी निष्काम होते. मनातील सर्व संशय नाहिसे होतात व ज्ञानसिद्धी प्राप्त होते. ज्ञानसिद्धीसमोर आणिकादी सिद्धी गौण ठरतात. ह्याच गौण सिद्धी आत्मज्ञानाच्या प्राप्तीला विघ्ने निर्माण करतात. व्यवहारात वागत असताना माणसाला द्वैत भासत नाही.

### आत्मज्ञानाचा विचार

माणूस आत्मज्ञानासाठी धडपड करीत असतो. कर्म, भक्ती आणि ज्ञान असे तीन मार्ग आहेत. वेदकाळापासून या तीन मार्गांची आपणाला माहिती आहे. अनेकांनी अनेक प्रकारे आपली मते मांडलेली आहेत.

१) जन्मताच काही सिद्धी असतात.

२) कांही औषधासिद्धी असतात.
३) काही तपाच्या सिद्धी असतात.
४) मंत्रामुळे सिद्धी प्राप्त होतात.
५) समाधीमुळे सिद्धी प्राप्त होतात.

सिद्धी प्राप्तीचे असे मार्ग आपल्याला दिसतात. योगमार्गातील प्रभुत्वामुळे सिद्धांना अग्नीवरून चालणे, वायुगतीने भ्रमण करणे, प्रदीर्घ काळापर्यंत शरीरधारणा करणे. अशा अलौकिक सिद्धी प्राप्त झालेल्या असतात. अशाप्रकारे प्राचीन कालौघात सिद्धी व साधना करणारे होते.

### सामााजिक स्तर

वरिष्ठ समाजाने कनिष्ठ समाजाला सर्व बाबतीत आपल्यात समाविष्ट करीत जीवन जगण्याचा प्रयत्न आपल्याला दिसून येतो. आर्य आणि अनार्य, स्थानिक आणि परस्थ, परकीय आणि एतदेशीय, ज्ञानी आणि अज्ञानी असे दोन स्तर भिन्न भिन्न काळात दिसून येतात. त्या त्या काळात दोन भिन्न स्तरांचे विलीनीकरण करण्याचा प्रयत्न झालेले दिसून येतात.

### विविधवृत्तींची निर्मिती : बौद्ध धम्माची मीमांसा

वैदिक तत्त्वावर पहिला आघात गौतम बुद्धाने केला. यज्ञातून होणाऱ्या हत्या वा हिंसा निंद्य आहे. जन्मापेक्षा कर्माला अधिक महत्त्व आहे. समाजातील भेदाभेद योग्य नाही. बुद्धसंघात समसमान संधी आहे. स्त्रियानीही प्रवेश मिळाला. भिक्षुसंघानी जगभर भ्रमणयात्रा केली. बौद्ध धम्माचा प्रसार केली. गौतम बुद्धाने लोकभाषेला महत्त्व दिले. त्याकाळातील पाली, मागधी, अर्धमागधी अशा सर्वसामान्यांच्या भाषा होत्या. या भोषतून बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथ निर्माण झाले. वर्णभेदाला पहिल्यांदा बुद्धाने तडा दिला.

### सिद्धमताचा संकेत

मानवी जीवन स्थिर व संपन्न होण्यासाठी मानवाने अनेक प्रयत्न केलेले आहेत. मानवी जाणिवांच्या शोधात प्रयत्न होऊ लागले. या काळात वेद, न्याय, योग, सहादर्शने–जैतमन–बौद्धमत, उपनिषदी, ब्रह्मसूत्रे, शिवसूत्रे, न्यायसूत्रे अशा ग्रंथाची रचना झाली. माणूस ईश्वराचा शाोधातच राहिला. आध्यात्माच्या क्षेत्रात क्रांती झाली. आध्यात्म सांगणारे संत–महंत निर्माण झाले. बौद्ध धर्मात वज्रयानी, सहजयानी पंथाचा उदय झाला. या क्षेत्रात तांत्रिकसाधना, योगसाधना, शक्तीउपासना यांना महत्त्व आले. त्या काळातील संतानी लोकभाषेत कवने लिहिली. सिद्धांनी लोकभाषेत आपले साहित्य निर्माण केले. सदाचारातून माणूस जगावा. यासाठी सिद्धांनी साहित्यनिर्मिती केली.

### सिद्ध संप्रदाय

भारत हा एक प्राचीनतम देश आहे. दहा हजार वर्षांचा इतिहास आहे. अनेक धर्म, पंथ व मतमतांतराचा जन्म या देशात झाला. एका पंथाची छाप दुसऱ्या धर्मावर पडली. अशातून एक वेगळीच संस्कृती उदयास आली. वैदिक, शैव, जैन, बौद्ध, इस्लाम ख्रिश्चन इत्यादी धर्माचा प्रचार नि प्रसार झाला. विविध धर्मांची मूल्ये मानवतावादी असल्याने माणसामध्ये मूल्यांची जोपासना झाली. एकमेकांशी माणसे एकरूप झाली. जगण्याचा मार्ग सुकर केले.

### वेदकाळातील अग्नीवर्णन करताना

अग्नेः वैश्वानरः
शांडिल्य गोत्र
मेष रूढो मेष ध्वज
मेषा रूढो जटाबुद्धी
आत्माभि मुखमासीन

एवं रूपो हुताशनः

वरील ओळीत मेष हे अग्नीचे वाहन आहे. ज्या ठिकाणी मेषाचे अस्तित्त्व आहे त्या ठिकाणी मेषपालाचे अस्तित्त्व असायलाच हवे.

## पुराण काळात बकऱ्याचा बळी देण्याचे वर्णन आढळते

अश्वंनैव गजंनैव
व्याघ्रंनैवच नैवच
अजापुत्रो बलिंद्यात
देवो दुर्बल घतिकः

वरील ओळीतून असे दिसून येते की, वाघ, घोडा, हत्ती या प्राण्यांचे बळी दिले जात नाही. या काळातही शेळ्या, मेंढ्यांचे अस्तित्व पुराणकाळातही होते. शेळी, मेंढीपालन हा व्यवसाय अत्यंत प्राचीन आहे.

## मानवी संस्कृती व धनगर समाज

मानवी संस्कृती ही माणसानेच निर्माण केलेली आहे. माणसाने आपल्या अनुकूलतेनुसार विविध जीवनोपयोगी साधनांचा शोध घेतलेला आहे. निरनिराळ्या युगात वा टप्प्यात स्वतःच्या गतीने बदलत व वाढत गेलेला आहे. संस्कृती म्हणजे जगण्याची रीत वा पद्धत होय.

## संस्कृतीची वैशिष्ट्ये

संस्कृतीची निर्मिती ही समग्र मानवी समाजाद्वारे होत असते. समाज व संस्कृती या नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाजाला सोडून संस्कृतीची कल्पना करणे अशक्य आहे. संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. एक पिढी दुसऱ्या पिढीला आपल्या परंपरा व आपला वारसा देत असते. प्रत्येक समाजाची संस्कृती त्या समाजाची आदर्शवत परंपरा असते. जीवनाची एक रीत असते. संस्कृतीला हजारो वर्षाचा इतिहास असतो हळूहळू संस्कतीत परिवर्तन होते.

## धनगर समाजाचा ऐतिहासिक मागोवा

वंशशास्त्रीयदृष्ट्या धनगरांची गणना शक द्रविडात होते. समाजाचे अस्तित्त्व टिकावे म्हणून काही गोष्टी करणे गरजेचे आहे. धनगर समाजात शेळया, मेंढ्या, गाई–म्हशी पालन करणे हा प्रमुख व्यवसाय आहे. गावोगावी अशी भटकंती सतत चालू असते. धनगर किंवा दनकार असे शब्दप्रयोग येतात. सर्व जगभर हा समाज अस्तित्त्वात आहे.

## धनगर समाजाची व्याप्ती

जगाच्या मध्य पूर्वेकडील भागात आफ्रिकेत याचा विस्तार प्रामुख्याने दिसून येतो. अरब राष्ट्रात प्रामुख्याने दिसून येतो. अरब राष्ट्रात प्रामुख्याने मेंढपाळ हा प्रामुख व्यवसाय दिसून येतो. भारताच्या अश्मयुगात इ. स. पूर्व १५०० च्या दरम्यान या समाजाची नोंद दिसून येते. प्राचीन काळापासून पशुधन वा पशुसंस्कृती अस्तित्त्वात होती. विविध प्रकारच्या जाती–जमातीनी आपली वैशिष्ट्ये, रूढी, परंपरा जपून ठेवलेल्या आहेत. डोंगराळ प्रदेशात, रानावनात, दऱ्या–खोऱ्यात तळ ठोकलेल्या या धर्मभोळ्या, कष्टाळू भटक्या जमातीस धरतीची लेकरे म्हणून ओळखले जाते. प्राचीन लोककथा व इतर लोकवाङ्मयातही या समाजाच्या खुणा आढळतात.

## निष्कर्ष

१) मध्ययुगात भक्तितत्वाचा पुरस्कार सामान्य जनतेनी केलेला होता.

२) महाराष्ट्र विविध संप्रदाय व परंपरा अस्तित्वात आहेत.

३) सर्वच संप्रदायानी ईश्वर शक्तीला मान्यता दिलेली आहे.

४) महाराष्ट्र हा मुलतः शिवभक्त आहे.

५) महाराष्ट्राच्या जनमासात विठ्ठल भक्तिचे आणि ग्रामव्यवस्थेत शिवमंदिराचे अस्तित्व जाणवते.

## संदर्भसूची

१) बहिरट भा. प., वारकरी संप्रदाय उदय आणि विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृष्ठ ५३.
२) कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६२,पृष्ठ २५२.
३) धनपलवार माणिक, श्रीविठ्ठल : एक चिंतन, हैद्राबाद, १९८७, पृष्ठ ३२.
४) गोसावी र. रा., पाच भक्ती संप्रदाय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८, पृष्ठ १५६.
५) सरदार गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२, पृष्ठ १३१.
६) रेचन्ना जी. एन., Wodeyar S.S. (chief editor), Shri
७) कुंभार रत्नाप्पा, वीरशैव दर्शन, मार्च १९८४, पृष्ठ १२.
८) महास्वामी उमापती शिवाचार्य, ज्ञानप्रसाद सिंदगी, विजापूर, प्रवचन्वृत, ऑगष्ट १९९१, पृष्ठ ०९.
९) आगरकर सुहास, महाराष्ट्रातील पंथ, डायमंड प्रकाशन, पुणे, ९ नोव्हेंबर २००९, पृष्ठ ३४.
१०) फाटक, न. र., व्यक्ती आणि कार्य, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २००२, पृष्ठ ३५.